# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## (जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी भंडारा)

## कंत्राटी पदभरती जाहिरात

१५ व्या वित्त आयोगा अंतर्गत भंडारा जिल्हयात खालील विविध पदे कंत्राटी तत्वावर तात्पुरती ११ महिन्याच्या कालावधीकरीता **Walk In Interview** पध्द्तीने भरावयाची आहे.

| अ.क्र. | मुळ पदाचे नाव | रिक्त पदे | नियुक्तीचे ठिकाण | प्रवर्ग व पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव | मानधन (प्रतिमाह) | वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Medical Officer MBBS | १४ | Bhandara, Mohadi, Tumsar, Sakoli, Lakhandur, Pauni, Lakhani | Total - 14 Post SC – 01, ST – 01, VJ A – 01, NT B – 01, NT C – 01, OBC – 03, EWS – 02, Open – 04. | MBBS | कामाचा अनुभव हा शासकीय/स्थानीक स्वराज्य संस्था/राष्ट्रीय आरोग्य अभियान चा असल्यास प्राधान्य | Rs.60,000/- | कमाल वयोमर्यादा ७० वर्ष, |

## अटि व शर्ती:-

१) वरील पदाची नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असुन तात्पुरती ११ महिण्याच्या कालावधी करिता असेल.

२) जाहिराती मध्ये दर्शविल्याप्रमाणे त्याचे पदाचे मानधन हे एकत्रित मासीक मानधन आहे.

३) निवड प्रकिये संबधी कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार तसेच जाहीरात किंवा मुलाखती रद्द करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष निवड समिती तथा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.भंडारा यांच्याकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.

४) निवड झालेल्या उमेदवारांना ११ महिन्याच्या कालावधीकरीता नेमणुक दिली जाईल. त्यापुढील कालावधीकरीता राज्य आरोग्य सोसायटी मुंबई यांचेकडुन अभियान सुरु ठेवण्यास व पदांना मंजूरी मिळाल्यानंतर तसेच मागील कालावधीत काम समाधानकारक असल्याच पुढील ११ महिण्याचे कालावधीकरीता नेमणूक दिली जाईल. पुनर्नियुक्तीबाबत, शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत कुठलाही दावा करता येणार नाही.

५) पद व पदांच्या संख्येत तसेच पदस्थापना ठिकाणामध्ये आवश्यकतेनुसार बदल होऊ शकतो.

६) कामाचा अनुभव हा शासकीय/स्थानीक स्वराज्य संस्था/राष्ट्रीय आरोग्य अभियान चा असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

७) तत्सम कौन्सिल चे नोदणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

८) केंद्र शासनाने संबंधित पद नामंजुर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्व सुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

९) सेवानिवृत्त असलेल्या उमेदवारास मुळ वेतन (Basic Pay) + ग्रेड पे या दोन्ही रकमेची बेरीज वजा निवृत्ती वेतन यामधील फरकाची रक्कम मानधन म्हणून अनुज्ञेय राहील.

१०) उमेदवाराची निवड ही फक्त गुणवत्तेनुसार करण्यात येईल.

११) ६० वर्षावरील अर्जदारांकरिता जिल्हा शल्य चिकित्सक प्रमाणित शारिरीक योग्यता (Physical Fitness) चे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. शासकीय कर्मचारी यांच्यावर पुर्वीच्या शासकीय कर्मचारी कार्यकाळात कुठल्याही स्वरुपाचे प्रशासकीय व वित्तीय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयाची नोंद नसावी किंवा झालेली नसावी.

१२) उमेदवाराने सोबत जोडलेल्या विहित नमूण्यातील अर्जातच परिपूर्ण माहिती भरुन संपूर्ण आवश्यक दस्ताऐवजासह Walk In Interview भरती प्रक्रियेच्या वेळापत्रकानुसार स्वत:हा सादर करावेत. नमूद मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज किंवा हरकती यांचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

१३) उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेवरुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल. मेरीट लिस्ट तयार करतांना Qualifying Exam मध्ये मिळालेले गुण + उच्च शैक्षणिक अर्हता + शासकीय/स्थानीक स्वराज्य संस्था/राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालयाचा अनुभव या बाबींचे गुण एकत्र करुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येवुन संबंधित पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येईल.

१४) कोविड १९ या साथरोगाचा प्रादुर्भाव असल्याने राज्य आरोग्य सोसायटीने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणेच पदवीचे अंतिम वर्षाचे गुण तसेच शासकीय/स्थानीक स्वराज्य संस्था/राष्ट्रीय आरोग्य अभियान कामाचा अनुभव, पदवी, पदव्युत्तर व इतर शैक्षणिक अर्हता यांचा विचार करुनच संवर्गाप्रमाणे गुणवत्ता यादी लावण्यात येणार आहे. भरती प्रक्रीये दरम्यान मुलाखत घेण्यात याव्यात असे आदेशित करण्यात आल्यास त्यावेळेस मुलाखती व इतर प्रक्रिया पार पाडली जाईल या बद्दलचे सर्व अधिकार निवड समितीकडे असतील.

१५) मुलाखत बाबत उमेदवारांना स्वतंत्रपणे लेखी स्वरुपात कळविण्यात येणार नाही. याबाबत <u>https://bhandara.gov.in</u> या संकेत स्थळावर जाहिर करण्यात येईल. सदर दिनांक व वेळ पाहून मुलाखतीला वेळेत उपस्थित राहण्याची जबाबदारी संबंधित उमेदवारांची असेल. याबाबत उपरत कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

१६) अर्जासोबत राखीव (मागास) प्रवर्गातील उमेदवारांनी शुल्क रुपये १००/- व खुल्या (अमागास) प्रवर्गातील उमेदवारांनी शुल्क रुपये १५०/- इतक्या रक्कमेचा नोंदणी शुल्क सोबत जोडण्यात आलेल्या <u>QR CODE</u> द्वारे अदा करावयाचे आहे. तसेच नोंदणी शुल्क अदा केल्याचा <u>Transaction ID No</u> पुरावा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१७) अर्जावर विहित ठिकाणी अलिकडच्या काळातील पासपोर्ट साईज फोटो लावावे व एक अतिरिक्त फोटो अर्जाला जोडावे.

१८) ज्या तांत्रीक संवर्गातील पदांना विहित केलेल्या केंद्र शासन अथवा राज्य शासनाच्या नोंदणी विभागाकडून वैध असलेल नोंदणी प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक असल्यामुळे अर्जासोबत सदर नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

१९) महाराष्ट्र नागरी सेवा नियम २००५ अन्वये लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन नमूना - अ या प्रपत्रात अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

२०) उमेदवाराने अधिवास व राष्ट्रीयत्वाचे सक्षम अधिकाऱ्यांकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

२१) शासन निर्णय दिनांक १३ जानेवारी २००९ नूसार खुला (अमागास), अनूसुचीत जाती/अनुसुचीत जमाती प्रवर्ग वगळता इतर मागास, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागासवर्ग प्रवर्गातील

उमेदवारांनी आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी दिनांक ३१ मार्च, २०२६ पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत असल्याचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

२२) वरील पदे राज्यशासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही. तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२३) सर्व पदांकरिता शासन मान्य विद्यापीठाचे पुर्ण वेळेचे कोर्सेस मान्य राहील.

२४) पदभरती संदर्भात वेळोवेळी प्रकाशित करण्यात येणाऱ्या आवश्यक https://bhandara.gov.in संकेत स्थळावर तसेच अर्ज केलेल्या ठिकाणी नोटीस बोर्ड वर प्रकाशित करण्यात येईल. वेगळी सुचना दिली जाणार नाही यांची उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

२५) उमेदवारांनी त्यांचा वैध ईमेल आयडी अर्जामध्ये सादर करणे आवश्यक आहे.

२६) वरील वैद्यकिय अधिकारी एमबीबीएस पदांकरिता **Walk in Interview** हे **दिनांक ०६ एप्रिल, २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, भंडारा** येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | विवरण | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | उमेदवारांची नोंदणी करणे | दिनांक ०६ एप्रिल, २०२३ | सकाळी १०.०० ते सकाळी ११.०० |
| २. | उमेदवारांच्या अर्जाची डाटा ऐन्ट्री करणे | | सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० |
| ३. | उमेदवारांचे मुळ दस्ताऐवज तपासणे | | दुपारी १२.०० ते दुपारी ०२.०० |
| ४. | मुळ दस्ताऐवज तपासणी नंतर गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे | | दुपारी ३.०० ते दुपारी ०५.०० |

२७) मुलाखती/कौशल्य चाचणी करीता उपस्थित राहण्याकरिता उमेदवारांना प्रवास भत्ता व इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

२८) वरील पदावर दिलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी राहणे बंधनकारक आहे. अशा प्रकारे उमेदवार राहत नसल्याचे निर्देशनास आल्यास त्या उमेदवाराच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

२९) पदभरती जाहीरातीत राखीव प्रवर्गाकरिता असलेल्या पदांकरिता राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणमध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेऊन प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवरांना तात्पुर्ती नियुक्ती देण्यात येईल व सबंधित उमेदवार प्राप्त झाल्यानंतर त्यांची नियुक्ती संपुष्ठात येईल.

३०) सदर रिक्त पदांसाठी आवश्यक पात्रता असलेला अर्जदार न मिळाल्यास किंवा आवश्यक त्या संख्येत अर्जदार न मिळाल्यास त्या पदाकरिता असलेली पात्रता (अर्हता व अनुभव) आवश्यकतेनुसार शिथिल करण्याचे संपुर्ण अधिकार निवड समितीला राहतील.

३१) अर्जदार हा संबंधित पदासाठी शाररिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फोजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

३२) जहिरातीमध्ये नमुद केल्याप्रमाणे उमेदवार उपलब्ध न झाल्यास दर आठवडयाचा प्रत्येक सोमवारी **Walk in Interview** द्वारे राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद परिसर, भंडारा येथे मुलाखत घेण्यात येईल.

24/03/2023

सदस्य
जि.ए.आ.व कु.क.सोसायटी तथा
जिल्हा शल्य चिकित्सक
जिल्हा रुग्णालय, भंडारा

सदस्य सचिव
जि.ए.आ.व कु.क.सोसायटी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, भंडारा

अध्यक्ष
जि.ए.आ.व कु.क.सोसायटी तथा
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, भंडारा

# अर्जाचा नमुना

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी
## आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, भंडारा
## अंतर्गत १५ व्या वित्त आयोग
## वैद्यकिय अधिकारी एमबीबीएस पदासाठी अर्ज

पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून स्वतः साक्षांकित करणे.

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्र. :-

१. पदाचे नाव (ठळक अक्षरात) :- ..........................................

२. अर्ज सादर करत असलेला प्रवर्ग :- ..........................................

३. उमेदवाराचे संपुर्ण नाव :- ..........................................

४. वडिलांचे संपुर्ण नाव :- ..........................................

५. जन्मतारीख :- दिवस..........महिना..........वर्ष..............

अक्षरी..........................................

..........................................

६. वय :- वर्ष..........महिना..........दिवस..............
(जाहीरात प्रसिध्द झाली त्या दिवशी)

७. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :- ..........................................

..........................................

..........................................

८. कायमस्वरुपी संपूर्ण पत्ता :- ..........................................

..........................................

..........................................

९. जातीचे प्रमाणपत्र आहे ? :- होय/नाही जातीचे नाव..............

जातीचा प्रवर्ग..............

१०. जात पडताळणी प्रमाणपत्र आहे ? :- होय/नाही प्रमाणपत्र क्रमांक..............

११. दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक (कायम सुरु असलेला क्रमांक) :- ..........................................

१२. ईमेल आयडी (अनिवार्य) :- ..........................................

१३. अर्जदार विवाहीत आहे किंवा नाही :- होय/नाही

१४. संगणकावर (एम.एस.सी.आय.टी, CCC, म.रा.तं.मं चाचणी परीक्षा वा तत्सम प्रोग्राम) :- होय/नाही, ..............................

१५. शैक्षणिक अर्हता :-

| धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील | बोर्ड/विद्यापीटाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | अंतिम वर्षाचे गुण | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण गुण | मिळालेले गुण | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१६. रजिस्ट्रेशन नोंदनी प्रमाणपत्र :- आहे/नाही ........... असल्यास क्र..........

१७. नोंदणी शुल्क :- अदा केले आहे/नाही..........असल्यास Transaction ID No..................

१८. अनुभव :- (शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा राष्ट्रीय आरोग्य अभियान) अनुभवाची साक्षांकित प्रत जोडावी. अन्यथा अनुभवाचे गुण ग्राहय धरले जाणार नाही.

| अ. क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नाव व पत्ता | धारण केलेले पद | कालावधी (वर्ष,महिने) | कामाचे स्वरुप | मानधन/वेतन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१९. इतर शैक्षणिक अर्हता :..............................................................................
..............................................................................

मी, असे प्रमाणित करतो/करते की, आपले कार्यालयातील.................................... या कंत्राटी पदाची जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. वरील अर्जात दिलेली माहिती खरी असून चुकीची व खोटी आढळून आल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

ठिकाण :- ......................
दिनांक :- .....................

उमेदवाराची स्वाक्षरी :-..............................

उमेदवाराचे पुर्ण नाव :-..............................

## प्रतिज्ञापन
## नमुना अ

मी श्री./श्रीमती/कुमारी ..............................................................................

श्री...............................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय....... वर्ष, राहणार,.............................................................................

याद्वारे असे जाहिर करतो/करते की,

(१) मी ................................................ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ..............(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै, २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

(३) दिनाक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै, २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-

सही/-

दिनांक:-

d:\admin\deepak sangle\contractual staff\paripatrak.docx

yono SBI

SBI Payments

MERCHANT NAME: JILHA EKATMIK AAROGYA VA KUTU

UPI ID: JILHAEKATMIKAAROGYA@SBI

## SCAN & PAY

BHIM

SBI Pay

BHIM | UPI

BHARAT INTERFACE FOR MONEY | UNIFIED PAYMENTS INTERFACE